# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली -४४२६०५ E-Mail : college.section@unigug.ac.in

जा.क्र./गों.वि.ग/म.वि.वि.वि./६८९ /२०२५ दि. १९ / ०६ /२०२५

## परिपत्रक

विषय:- शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील विद्यमान तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्यावत करणेबाबत.

संदर्भ:- १. मा. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुबंई यांचे परिपत्रक क्र.:२/एनजीसी/IntakeApproval/२०२५/ ४१८ दि. २३ मे, २०२५

२. मा. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुबंई यांचे परिपत्रक क्र.:२/एनजीसी/IntakeApproval/२०२५/ ५०९ दि. १७ जून, २०२५

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी व पदव्युत्तर महाविद्यालयातील मा. प्राचार्य यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2025-26 मधील तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरीता सहभागी असणाऱ्या विद्यमान संस्थांची अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेबाबतची माहिती अचूक व अद्ययावत असणे आवश्यक आहे. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचे मार्फत तांत्रिक व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरु होणार आहे. त्याअनुषंगाने संलग्नित महाविद्यालयांनी तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष 2025-26 करीता संबंधीत शिखर परिषदेच्या मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार संबंधीत विद्यापीठ यांचेकडून संलग्नता/समकक्षता प्रदान केल्याची माहिती, तसेच संस्थेची सांख्यिकीय माहिती तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संदर्भ क्र. 1 च्या पत्रामध्ये दिलेल्या लिंकवर अद्ययावत करुन दि. 15/06/2025 रोजीपर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले होते. परंतु अद्यापही संस्थांची माहिती अद्यावत करण्याचे प्रलंबित असल्याने संदर्भ क्र. 2 च्या पत्रान्वये वरील माहिती अद्यावत करण्याकरीता दि. 01 जुलै, 2025 पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

करीता संदर्भीय पत्राचे अवलोकन करुन त्यानुसार कार्यवाही घ्यावी.

सहपत्र:- वरीलप्रमाणे संलग्नित.

( श्री. दिनेश नरोटे )
सहायक कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रति,

मा. प्राचार्य,
विद्यापीठाशी संलग्नित सर्व व्यावसायिक
तांत्रिक पदवी व पदव्युत्तर महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रतिलिपी -

१. मा. कुलगुरु महोदय यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग
आवक क्र. 808 दिनांक 18.6.2025
जावक क्र............. दिनांक.............

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
विद्या विभाग
आवक क्र.......... दि..........
जावक क्र. 968 दि. 18/06/25

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४७५, ४६५, ४९२, ४३२, ४४३, ४४७
ई-मेल - desk२@dtemaharashtra.gov.in वेबसाईट : http://www.dte.maharashtra.g

परिपत्रक

क्रमांक : २ /एनजीसी/Intake Approval/२०२५/५०९ दिनांक : 17 JUN 2025

प्रति,

प्राचार्य / संचालक

सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या विद्यमान संस्था

विषय :-शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील साठी तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत..

संदर्भ : १)संचालनालयाचे परिपत्रक क्र.२/Intake Approval/२०२५/४१८, दि.२३.५.२०२५

३)शासन पत्र क्र.E-No.११३९५१७/MHT/(TE-५), दि.१६.६.२०२५

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया व वास्तुकला परिषद अशा शिखर परिषदांद्वारे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीताची मान्यता प्रक्रिया सुरु असुन पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांना या शिखर परिषदांद्वारे मान्यता प्रक्रियेची कार्यवाही सुरु आहे. त्याअनुषंगाने आपल्या संस्थेतील पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता त्यानुसार विद्यापीठाची संलग्नता / समकक्षता प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करुन दि.१५ जुन २०२५ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत संचालनालयाच्या संदर्भाधीन परिपत्रकान्वये निर्देशित करण्यात आले होते. अद्यापही संस्थांची माहिती अद्ययावत करण्याचे प्रलंबित असल्याचे संचालनालयाच्या निदर्शनास आले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली व कौंसिल ऑफ आर्कीटेक्चर, नवी दिल्ली यांच्याकडुन मान्यताप्राप्त संस्थांमधील, अभियांत्रिकी पदविका व वास्तुकला पदविका अभ्यासक्रमांच्या प्रथम फेरी च्या सुरुवातीपर्यत म्हणजेच (दिनांक ३०.०६.२०२५) पर्यत संलग्नता प्राप्त अभ्यासक्रमांचा समावेश केंद्रीभुत प्रवेश प्रकियेत करुन, प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यास संदर्भाधीन शासन पत्रान्वये मान्यता मिळालेली आहे. तद्नंतर संलग्नता मिळणाऱ्या संस्थांचा समावेश प्रवेश प्रकियेच्या वेळापत्रकानुसार उपलब्ध असलेल्या फेरीत करण्यास व त्यानंतर संलग्नता मिळणाऱ्या संस्थांना संस्थास्तरावर प्रवेश करण्यास शासनाने परवानगी दिली आहे. त्यानुसार पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश उपरोक्तप्रमाणे करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने, आपणांस कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली व कौंसिल ऑफ आर्कीटेक्चर, नवी दिल्ली यांच्याकडुन मान्यताप्राप्त संस्थांमधील पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठाची संलग्नता / समकक्षता प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करुन दि.१ जुलै २०२५ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करावी. कोणत्याही संस्थेची माहिती अद्ययावत करणे प्रलंबित राहिल्यास व त्यामुळे संस्थेचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या फेरीमध्ये न झाल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहील. तसेच, मंजूर प्रवेश क्षमतेची माहिती ही प्रवेश प्रक्रियेदरम्यान जागा वाटपात दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहितीत कोणतीही चूक झाल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उद्भवल्यास त्यास संबंधित संस्थेचे प्राचार्य सर्वस्वी जबाबदार राहतील.

(Email)

सहा.कुल.
महा. विभाग
सदर पत्र आपल्या विभागाशी संबंधित असल्याने आपल्या विभागाचे अग्रेषित.
18/06/25

Ku. manisha
18/6/025

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत : १) मा.अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सादर.

२) मा.आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित

३) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठ यांना कळविण्यात येते की, शासन पत्रातील निर्देशांचे पालन करुन संलग्नता समकक्षता प्रदान करण्याच्या अनुषंगाने उचित कार्यवाही विहीत कालमर्यादेत करावी. तसेच, विद्यापीठाकडून संस्थाना संलग्नता प्रदान करण्याबाबतची कार्यवाही दि.०१ जुलै २०२५ दुपारी २.०० वाजेपर्यंत करावी.

४) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, नागपूर, नाशिक व पुणे

त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपण आपल्या स्तरावरुन आपल्या अधिनस्त सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थांच्या निदर्शनास आणून द्यावे. पदवी व पदव्युतर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांनी सादर केलेली माहिती पडताळणी करुन व अचूक माहिती प्रमाणित करुन संकेतस्थळावर दि.०२ जुलै २०२५ सायं ५.०० वाजेपर्यंत अद्ययावत करावी व त्याबाबतचा अंतिम अहवाल संचालनालयास सादर करावा.

५) अध्यक्ष / सचिव, सर्व विद्यमान व्यावसायिक तांत्रिक पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था, यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

६) कार्यासन अधिकारी, का. क. ३, मुख्य कार्यालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, विभागीय कार्यालयांकडून पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या विद्यमान संस्थांची प्रमाणित केलेली माहिती राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४६५/४५०/४४२/४४३/४४७
ई-मेल – desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

परिपत्रक

क्रमांक : २ /एनजीसी/Intake Approval/२०२५/ ४१८ दिनांक : 23 MAY 2025

प्रति,
प्राचार्य/संचालक
सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या विद्यमान संस्था

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील साठी विद्यमान तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत..

संदर्भ : मा.आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचे पत्र क्रमांक तंशिप्र - १२२५/प्र.क्र.११/कें.प्र.प्र./ २०२५/९७९,दिनांक १३.५.२०२५

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता सहभागी असणा-या विद्यमान संस्थांची अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेबाबतची माहिती अचूक व अद्ययावत असणे आवश्यक आहे. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचेमार्फत पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरु होणार आहे.

त्याअनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेबाबत पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठ यांचेकडून संलग्नता/ समकक्षता प्रदान केल्याची माहिती, तसेच त्यासोबतची संस्थेची सांख्यिकीय माहिती तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या https://ugpg25.dtemaharashtra.gov.in/ या लिंकवर अद्ययावत करुन दि.१५/०६/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करावी.

सदर माहिती प्रवेशासंबंधी असल्याने माहितीची संवेदनशीलता व कालमर्यादा लक्षात घेता, ती विहीत कालावधीत व अचूक असण्याबाबत विशेष दक्षता घेण्यात यावी. याबाबत विद्यमान संस्थांना https://ugpg25.dtemaharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर माहिती भरण्यासाठी ऑनलाइन प्रणाली उपलब्ध करुन देण्यात येत असून, या प्रणालीवर सर्व संस्थांना माहिती भरण्याबाबत या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येत आहे.

मंजूर प्रवेश क्षमतेची माहिती ही प्रवेश प्रक्रिये दरम्यान जागा वाटपात दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहितीत कोणतीही चूक झाल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उद्भवल्यास त्यास सर्वस्वी संबंधित संस्थेचे प्राचार्य / संचालक जबाबदार राहतील. सदर विषयाबाबत संबंधितांनी करावयाच्या कार्यवाहीसंबंधी विस्तृत सूचना सोबत जोडलेल्या आहेत.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : १. मा.आयुक्त , राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित

२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर - त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपण आपल्या स्तरावरुन आपल्या अधिनस्त सर्व विद्यमान संस्थांच्या निदर्शनास आणून द्यावे. पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांनी सादर केलेली माहिती पडताळणी करुन व ती माहिती प्रमाणित करुन संकेतस्थळावर दि.१६/०६/२०२५ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अद्ययावत करावी व त्याबाबतचा अंतिम अहवाल संचालनालयास सादर करावा.

३. अध्यक्ष / सचिव, सर्व विद्यमान व्यावसायिक तांत्रिक पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था, यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

४. कार्यासन अधिकारी, का. क्र. ३, मुख्य कार्यालय, मुंबई - यांना कळविण्यात येते की, विभागीय कार्यालयांकडून पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या विद्यमान संस्थांची प्रमाणित केलेली माहिती राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

# Instructions for UG/PG/Integrated/Dual Degree Courses

(परिपत्रक क्रमांक: 2/एनजीसी/Intake Approval/2025/418 , दिनांक : 23/05/2025)

All institutes which are conducting Under Graduate, Post Graduate, Integrated and Dual Degree Courses are hereby informed to check the correctness of already filled data or update their institute data related with courses approved for academic year 2025-26 by AICTE/PCI/CoA (as applicable) through their Institute Login immediately available on https://ugpg25.dtemaharashtra.gov.in/.

All Institutes shall exercise the check/update activity with utmost care, as the same data shall be processed for the allotment / admissions. The Principal/Director of the institute shall be responsible for incorrect allotment if the data checked/updated by the institutes is found not in conformity with the approvals given by the appropriate authorities.

**The Institutes shall be able to update the following information for academic year 2025-26 as given below:**

1. Institute Details, Institute Status, Contact details of Principal/Director, Registrar, Approval Letters, Hostel Information, Faculty Details, Beneficiary Details, Placement & Internship, Pass out Data, Fee Structure, NAAC, AISHE Code.
2. Course wise details
    1. Previous Academic Year (2024-25) Intake as per GR - <u>only for View</u>.
    2. Intake as per the approval letter from AICTE/PCI/CoA.
    3. Intake as per the Government Resolution (GR)-RO /DTE can update.
    4. Intake as per University affiliation.
    5. Intake & Remark as per the Hon. Court directives (if any) - This will be updated by Regional Office/DTE from time to time.
    6. NRI/FN/OCI/CIWGC/PIO Approval as per Apex Body
    7. Status for Accreditation of Institution / Course (NBA)[Pre-Qualifier, SAR, NBA, Reason for not eligible for NBA, if any]
3. Upload Approval /Affiliation/GR/Court Order/Accreditation/etc.
4. Update Seat Surrender (if any) for Un-Aided Institutions.
5. Verify Institute Profile along with Seat Surrender, if any.

**Note : The Final Intake for Admission for academic year 2025-26 shall be calculated automatically by the system based on the above inputs and the Seat Distributions shall be displayed by considering the institution status and Seat Surrender, if any.**